मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 16 जून 2024 | पान- 1

# डासोत्पत्ती ठिकाणांवर महापालिकेची कारवाई

## कारवाईमध्ये 156 आस्थापनांना नोटीस : 10 हजारांचा दंड वसूल तर 156 आस्थापनांना नोटीस

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य व वैद्यकीय विभागाने शहरातील विविध ठिकाणी डास उत्पत्ती स्थानांची पाहणी करून डासांच्या अळ्या आढळलेल्या ठिकाणांच्या जागा मालकांवर आणि संबंधितांवर दंडात्मक कारवाई केली आहे. १ जून २०२४ पासून सुरू असलेल्या या कारवाईमध्ये १५६ आस्थापनांना नोटीस बजावण्यात आली आहे. तर आतापर्यंत एकूण १० हजार रुपये दंड वसूल करण्यात आला असल्याची माहिती आरोग्य व वैद्यकीय विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

किटकजन्य आजारांना आळा घालण्यासाठी शहरात विविध उपाययोजना करण्यात येत असून औद्योगिक, बांधकाम आस्थापना, कार्यालये, गृहसंस्था, घरे तसेच व्यावसायिक दुकानांसह सर्व आस्थापनांनी आपल्या ठिकाणी असलेली डास उत्पत्ती स्थळे तात्काळ नष्ट करावीत, अन्यथा कठोर कारवाई केली जाईल असा इशाराही देण्यात आला आहे.

डेंग्यू, चिकुणगुण्या, मलेरिया अशा किटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विविध भागांची तपासणी करून नोटीस बजावण्याची कारवाई महापालिकेने मोठ्या प्रमाणात सुरू केली आहे.शहरात डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिकेच्या तपासणी पथकातील कर्मचारी तपासणीसाठी आल्यास त्यांना नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहनही महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.



**डासोत्पत्ती ठिकाणे आढळून आल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई**

**» शहरात सुरू असलेल्या विविध बांधकाम आस्थापनांवर महापालिकेचे लक्ष आहे. पाणी साठणाऱ्या भागांची तपासणी करून संबंधितांना नोटीसा बजावण्यात येत आहेत. शिवाय अशी ठिकाणे आढळून आलेल्या आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.**

> घराच्या आत आणि बाहेर स्वच्छ पाण्याने भरलेल्या कंटेनरमध्ये डासांची उत्पत्ती होत असते, शिवाय घरातील फ्लॉवर-पॉट, मनी प्लांट्स आणि फ्रीज ड्रिप पॅनमधील पाण्यात देखील अशी उत्पत्ती आढळून येते यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून नागरिकांनी या साधनांची नियमितपणे तपासणी करणे देखील आवश्यक आहे.
>
> **- यशवंत डांगे, सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

> महापालिकेच्या रुग्णालयांत तसेच दवाखान्यांमध्ये डेंगूच्या तपासणीकरिता आवश्यक असलेले रॅपिड किट उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. किटकजन्य रोग नियंत्रणासाठी स्वच्छ पाण्यात गप्पी मासे सोडणे, नागरिकांच्या घरांच्या कंटेनरचे सर्वेक्षण, व्यवसायाच्या ठिकाणांचे सर्वेक्षण केले जात आहे. पावसाळ्यात हिवताप, डेंग्यु, चिकुनगुन्यासारखे रोग पसरू नयेत यासाठी महापालिकेने खबरदारी घेतली आहे. शहरातील डेंग्यू, मलेरिया प्रतिबंधक मोहिमेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे.
>
> **- डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

# कविता भोंगाळे युवा मंचच्या नथ बनविणे कार्यशाळेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली भोसरी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला

**पिंपरी | प्रतिनिधी**

दमदार आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली कविता भोंगाळे युवा मंच, गायत्री सखी मंच व माणदेशी फाउंडेशन म्हसवड यांच्या संयुक्त विद्यमानाने वटपौर्णिमेनिमित्त खास महिलांकरिता नथ बनवणे कार्यशाळा गंगोत्री पार्क, भोसरी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेत दिघी,भोसरी परिसरातील शेकडो महिलांनी सहभागी होत कार्यशाळा यशस्वी पार पडली.

भाजपा चिटणीस सौ. कविताताई भोंगाळे - कडू यांच्या पुढाकाराने भोसरी परिसरात महिला, युवक-युवती, ज्येष्ठ नागरिकांसाठी नेहमीच विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी मदत व्हाही या सामाजिक भावनेतून वटपौर्णिमेनिमित्त खास महिलांसाठी नथ बनवणे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले या कार्यशाळेत महिलांना विविध प्रकारच्या नथ बनवायला शिकवल्या गेल्या. तसेच नथ बनवण्यासाठी लागणारे साहित्य, किंमत याची माहिती देण्यात आली त्यासोबत आपल्या आजूबाजूला उपलब्ध असलेल्या बाजारपेठेची माहिती कार्यशाळेत सहभागी महिलांना देण्यात आली.

यावेळी बोलताना सौ कविताताई भोंगाळे म्हणाल्या की आजच्या धावपळीच्या जीवनात महिलांना त्यांच्या आवडी निवडी जपता यायला हव्यात त्या दृष्टीने आम्ही गायत्री सखी मंचच्या माध्यमातून सदैव वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवत असतो. त्यास नागरिकांचा जो मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभतो त्यातून सामाजिक काम करायला एक प्रकारे प्रोत्साहन मिळत असते. आगामी काळात भोसरी, दिघी परिसरात होतकरू महिलांच्या साथीने बचत गटांची चळवळ मजबूत करत आमदार महेशदादा लांडगे यांच्या माध्यमातून महिलांनी गृहउद्योगाच्या माध्यमातून बनवलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार आहोत

कार्यशाळेत माणदेशी फाउंडेशनच्या तज्ञ प्रशिक्षकांकडून मार्गदर्शन करण्यात आले तसेच सहभागी प्रशिक्षार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी भाजपा प्रभाग क्रमांक पाच महिला अध्यक्षा सौ. स्वातीताई शिर्के, सौ.शीला कदम, सौ. सुमन घोलप.सौ. जयश्री ढगे. सौ. कल्पना धाडसे, सौ मनीषा निकम,सौ.कविता जाधव आदी मान्यवरांसह भोसरी दिघी परिसरातील शेकडो महिला प्रशिक्षणार्थी महिला उपस्थित होते.



# पब, हॉटेल्सनंतर आता होर्डिंगवर 'हातोडा'

## पीएमआरडीएच्या वतीने यंत्रणा तैनात : मुळशी तालुक्यातून होणार पहिली कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) हिंजवडी परिसरातील अनधिकृत पब, हॉटेल्स, रेस्टॉरंट आणि बार यावर कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर आता ही कारवाई अनधिकृत होर्डिंगवर वळवण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने प्राधिकरणाकडून स्थापन केलेल्या स्वतंत्र आकाशचिन्ह विभागाच्या वतीने यंत्रणा तैनात करण्यात आली आहे. कारवाई बाबतची निविदा उघडली असून, मुळशी तालुक्यात पहिली कारवाई होण्याची शक्यता आहे.





पीएमआरडीएच्या ९ तालुक्यात जवळपास हजारो अनधिकृत होर्डिंग उभारण्यात आलेली आहेत. प्राधिकरणाने काही दिवसांपूर्वी या सर्व तालुक्यात सर्वेक्षण पूर्ण केले. त्यानुसार पहिल्या टप्प्यात १ हजारांच्या आसपास अनधिकृत होर्डिंग, जाहिरातफलक, बोर्ड याची माहिती गोळा केली आहे. त्याबाबत त्यांना नोटीस आणि मंजुरीबाबत अर्ज करण्याचे आवाहन केले होते. दरम्यानच्या काळात लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने होर्डिंगवर कारवाई होऊ शकली नाही. त्यातच कारवाई संदर्भात निविदा उघडण्यात येत नव्हती. प्राधिकरणाने जिल्हाधिकारी तसेच, राज्याच्या नगरविकास विभागाकडे देखील मार्गदर्शन मागवले होते. मात्र, आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर प्राधिकरणाने पुढील कार्यवाही सुरू केली आहे.

लोकसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर सोमवारी (१० जून) होर्डिंग कारवाईबाबत मागवण्यात केलेल्या निविदा उघडण्यात आल्या. त्यानुसार पुणे जिल्ह्यातील हर्षदा कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराला होर्डिंग कारवाईबाबत आदेश देण्यात येणार आहेत. पीएमआरडीए आयुक्त राहुल महिवाल यांच्याकडे सध्या पिंपरी-चिंचवड महापालिकेचा कारभार देखील सोपवण्यात आला आहे. त्यामुळे त्यांची अंतिम स्वाक्षरी झाल्यानंतर होर्डिंगवरील कारवाईची वाट मोकळी होणार आहे. पीएमआरडीएच्या नऊ तालुक्यात टपाटप्याने ही कारवाई करण्यात येणार आहे. त्याची सुरुवात मुळशी तालुक्यातून होण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षी या तालुक्यात होर्डिंग कोसळल्याची जास्त घटना घडल्या होत्या. त्या अनुषंगाने स्थानिक ग्रामपंचायतीकडून माहिती मागवण्यात आलेली आहे.

पीएमआरडीएने अनधिकृत होर्डिंगधारकांना परवानगीबाबत आवाहन केले होते. त्यानुसार विविध गावातून जवळपास ३४१ अर्ज होर्डिंगची परवानगी मिळावी, यासाठी प्राप्त झाले आहेत. त्यातील सर्वाधिक अर्ज हे मुळशी आणि मावळ तालुक्यातील आहेत. तर, भोर आणि वेल्हा या तालुक्यातून देखील अर्ज दाखल झाले आहेत. त्यामुळे त्याबाबत परवानगीसाठी आयुक्तांकडे अहवाल पाठवण्यात आलेला आहे.

### प्राधिकरणाला मिळणार महसूल

**» पीएमआरडीएमध्ये यापूर्वी स्वतंत्र असा आकाशचिन्ह परवाना विभाग नसल्याने अनधिकृत होर्डिंगचे पेव फुटले होते. त्यामुळे त्यावर कोणतेही निर्बंध नव्हते. मात्र आता स्वतंत्र नियमावली तयार होणार असल्याने या माध्यमातून प्राधिकरणा अतिरिक्त महसूल मिळणार आहे. त्याचप्रमाणे अनधिकृत होर्डिंगवर कारवाई झाल्यानंतर त्या माध्यमातून देखील काही रक्कम मिळणार आहे. होर्डिंग पडल्यानंतर ते जप्त करण्यात येणार असून, ३५ टक्के रक्कम ही त्या ठेकेदाराने प्राधिकरणाला अदा करावी लागणार आहे.**

# पावसाळी लाईनमधील केबल घुसखोरांवर कारवाईचा इशारा!

## पावसाळी लाईन, चेंबरमध्ये विनापरवाना केबल टाकल्यास पालिका कायदेशीर कारवाई करणार

**पुणे | प्रतिनिधी**

विनापरवानगी पावसाळी लाईनमध्ये ऑप्टिकल केबल टाकल्याने रस्त्यावर पाणी साचत असल्याचा दावा महापालिकेने केला आहे. पावसाळी लाईनची साफसफाई करताना केबल काढून टाकण्याचे धोरण पालिकेने हाती घेतले असून पुन्हा केबल पावसाळी लाईन, चेंबरमधून टाकल्यास त्या कापून काढल्या जातील आणि कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा पथ विभागाने दिला आहे. सिंहगड ब्रम्हा हॉटेल परिसरातील पावसाळी लाईनमधे जिओ कंपनीने ऑप्टिकल केबल टाकल्याचे आढळून आले होते.



या केबल पालिकेने काढून टाकल्यावर जिओ कंपनीने विनापरवानगी पुन्हा त्या केबल टाकल्या. त्यामुळे पथ विभागाने जिओच्या दोन अधिकाऱ्यांविरोधात सिंहगड पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. त्यानंतर कंपनीने पालिकेची परवानगी असल्याचा दावा केला होता. परंतु खोदाई करून तसेच पदपथाखालून केबल टाकण्याची परवानगी दिली जाते, असे पथ विभागाने स्पष्ट केले आहे. तसेच कंपनीली आर.सी.सी पाईपमधून केबल टाकण्याची परवानगी दिली असली तरी त्याचा अर्थ असा होत नाही की पावसाळी लाईनमधून टाकावी. त्यामुळे पालिकेला पावसाळी लाईन किंवा कोणत्याही चेंबरमधून केबल टाकल्याचे आढळल्यास थेट कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे.

### एमएसईबीला देणार नोटीस

**» पावसाळी लाईनमध्ये जिओच्या ऑप्टिकल केबलसह एमएसईबीच्या केबल आढळून आल्या आहेत. या केबल धोकादायक नसल्याने त्या कापण्यात आल्या नाहीत. मात्र केबल काढून टाकण्यासाठी एमएसईबीला सांगण्यात आले आहे. जर त्यांनी दिलेल्या वेळेत काढल्या नाहीत तर पालिकेकडून कारवाई केली जाईल, असा इशाराही पथ विभागाने दिला आहे.**

महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी जिओ कंपनीच्या अधिकाऱ्यांवर पोलीस कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार गुरुवारी जिओचे सुनील देशमुख व दिनेश पाटील या दोघांविरुद्ध पथ विभागाकडून पथ विभागाचे कार्यकारी अधिकारी रायकर यांनी पोलिसांत तक्रार दिली आहे.

जिओ कंपनीची पावसाळी लाईनमधील केबल घुसखोरी लक्षात आल्यावर पालिका आयुक्त भोसले यांनी थेट कंपनीच्या प्रमुखाला हजर करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर अधिकाऱ्यांनी तातडीने जिओ कंपनीच्या दोन अधिकाऱ्यांविरोधात पोलिसांत तक्रार दिली आहे. मात्र पालिकेने केवळ तक्रारीचा खेळ न करता शहरातील किती पावसाळी लाईनमधून अशा केबल्स टाकल्या आहेत, त्याची पाहणी करावी. तसेच त्यांच्याकडून दंड वसूल करावा अशी मागणी पुणेकरांनी केली आहे.

# विधानसभेची ‘परीक्षा’ होणार अवघड

## राजकीय आरोप-प्रत्यारोपांचे वातावरण शांत होत नाही, तोच विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीतील राजकीय आरोप-प्रत्यारोपांचे वातावरण शांत होत नाही, तोच विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी या तीन विधानसभा मतदारसंघांतून निवडणूक लढविण्यासाठी महायुती व महाविकास आघाडीतील घटकपक्षांत जागांचे कसे वाटप होते? की सर्वच पक्ष २०१९ प्रमाणे स्वबळावर लढणार?

हे स्पष्ट झालेले नसताना राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये मात्र ‘आपण लढणार’ याबाबत दावे-प्रतिदावे सुरू झाले आहेत. गेल्या अडीच-तीन वर्षांत बदललेल्या राजकीय घडामोडींमुळे प्रत्येक पक्ष व नेतृत्वासाठी विधानसभा निवडणूक ‘परीक्षा’च ठरणार आहे.

लोकसभेची २०१९ ची निवडणूक भारतीय जनता पक्ष-शिवसेना युती आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस-कॉंग्रेस यांची आघाडी यांच्यात लढली गेली होती. शहराचा समावेश असलेल्या मावळ मतदारसंघात शिवसेनेचे श्रीरंग बारणे विरुद्ध राष्ट्रवादीचे पार्थ पवार आणि शिरूर लोकसभा मतदारसंघात शिवसेनेचे शिवाजीराव आढळराव पाटील विरुद्ध राष्ट्रवादीचे डॉ. अमोल कोल्हे यांच्यात लढत झाली होती.

त्यानंतर सहा महिन्यांनी झालेली विधानसभेची निवडणूक भारतीय जनता पक्ष, कॉंग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस, वंचित बहुजन आघाडी, आम आदमी पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, बहुजन समाज पक्ष यांनी स्वतंत्रपणे लढली होती. त्यात भाजपने चिंचवड व भोसरी विधानसभा मतदारसंघात तर, पिंपरीत राष्ट्रवादी कॉंग्रेसने बाजी मारली होती. अनुक्रमे लक्ष्मण जगताप, महेश लांडगे, अण्णा बनसोडे विजयी झाले होते.सत्ता स्थापन करताना युती तुटली आणि शिवसेनेने भाजपची साथ सोडून कॉंग्रेस व राष्ट्रवादीला साथ देत महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले होते.



### पिंपरी, चिंचवड व भोसरी या तीनही मतदारसंघात सद्य:स्थिती

» पिंपरी, चिंचवड व भोसरी या तीनही मतदारसंघात सद्यःस्थितीत महायुतीचे आमदार आहेत. त्यात अनुक्रमे राष्ट्रवादीचे अण्णा बनसोडे, भाजपच्या अश्विनी जगताप व भाजपचेच महेश लांडगे यांचा समावेश आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत अर्थात मावळ व शिरूर मतदारसंघातून महाविकास आघाडीच्या उमेदवारांपेक्षा महायुतीच्या उमेदवारांना एक लाख एक हजार ६८ मते अधिक मिळाली आहेत महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांना पिंपरी विधानसभा मतदारसंघातून १६ हजार ७३१ व चिंचवडमधून ७४ हजार ७६५ मताधिक्य मिळाले आहे. तर, भोसरीतून शिवाजीराव आढळराव पाटील यांना नऊ हजार ५७२ मते अधिक मिळाली आहेत..

### माजी नगरसेवकांचे आकडे बोलतात...

» मार्च २०२२ मध्ये मुदत संपलेल्या पिंपरी-चिंचवड महापालिकेत भाजपचे ७७, राष्ट्रवादीचे ३६, शिवसेनेचे नऊ, अपक्ष पाच, मनसेचे एक असे १२८ माजी नगरसेवक होते. मात्र, राजकीय घडामोडींनंतर भाजपच्या सात जणांनी पक्ष सोडला आहे. त्यातील एक शिवसेनेत व सहा जण राष्ट्रवादीत गेले आहेत. राष्ट्रवादीतील पाच जण अजित पवार यांच्यासोबत पर्यायाने महायुतीचे घटक आहेत. मनसेची महायुतीला साथ आहे. शिवसेनेतील काहींनी अद्याप भूमिका स्पष्ट केलेली नाही. तर, काहींनी उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व कायम ठेवले आहे. ‘राष्ट्रवादी’च्या एका माजी नगरसेविकेने शरद पवार यांचेच नेतृत्व कायम ठेवले आहे. कॉंग्रेसचा एकही नगरसेवक नव्हता.

### भविष्यातील शक्यता...

» ‘महायुती व महाविकास आघाडीने विधानसभा निवडणूक एकत्रित लढल्यास जागा वाटपावरून वितुष्ट होणार, बंडखोरी अटळ असणार. प्रत्येक पक्षाने स्वतंत्रपणे निवडणूक लढल्यास प्रत्येक उमेदवार व पक्षाची कसोटी लागणार, नवीन समीकरणे बघायला मिळणार. विधानसभा निवडणुकीतील कामगिरीवर आगामी महापालिका निवडणुकीत उमेदवारीची संधी मिळणार. एकत्रित असो वा स्वतंत्र असो, आगामी महापालिका निवडणुकीसाठी इच्छुकांची संख्या व जागा वाटपाचे गणित बिघडण्याची शक्यता. महापालिकेची मुदत संपून तीन वर्ष होत असल्याने अनेक माजी नगरसेवकांचा नागरिकांशी तुटलेला संपर्क घातक ठरू शकतो

# सकाळच्या सत्रातील शाळा भरणार दुपारच्या सत्रात

## महापालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडून कार्यवाही सुरु, लहान मुला -मुलींचे वर्ग दुपारच्या सत्रात भरणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या पहिली ते चौथीचे वर्ग पूर्वी सकाळच्या सत्रात भरत होते. मात्र आता शासनाच्या आदेशानुसार लहान मुला -मुलींचे वर्ग दुपारच्या सत्रात भरणार आहे. या नव्या बदलामुळे महापालिकेने मुली आणि मुलांना एकत्र बसण्याची व्यवस्था केली आहे. याबाबत शिक्षण विभागाने मुख्याध्यापकांना सूचना केल्या आहेत.

बदललेली जीवनशैली आणि विविध कारणामुळे विद्यार्थी रात्री उशिराने झोपतात आणि सकाळी लवकर शाळा असल्याने त्यांची झोप पूर्ण होत नाही. पालकांच्या मते पाल्याची झोप ही सकाळी पूर्ण न झाल्याने शाळेत जाण्यास ते तयार नसतात. यावर शिक्षण विभागाने अध्यादेश जारी केला आहे. त्यानुसार प्रत्येक माध्यमाच्या शाळांनी पूर्व प्राथमिक ते चौथीपर्यंतचे वर्ग सकाळी ९ किंवा त्यानंतर भरविण्याबाबतचे नियोजन केले आहे. महापालिका शाळांसह अनेक शाळांनी वेळेमध्ये बदल केले आहेत.

दरम्यान, १५ जून २०२४ पासून सोमवार ते शनिवार पूर्व प्राथमिक ते चौथीपर्यंतचे वर्ग दुपारी सव्वाबारा ते पाच या वेळेत भरणार आहेत. पाचवी ते आठवीचे वर्ग सकाळी साडेसात ते साडेअकरा या वेळेत भरणार आहेत. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये १५ जूनपासून सकाळच्या सत्रात शाळा भरवण्याचा निर्णय महापालिकेने घेतला होता. परंतु दुपारची शाळा सुरू करण्याबाबत शिक्षकांमध्ये मतभिन्नता दिसून आली होती. विशेषतः बहुतांश महिला शिक्षकांनी या निर्णयाला विरोध केला होता.



> “पूर्व प्राथमिक ते चौथीपर्यंतच्या सर्व शाळा सकाळच्या सत्रात भरविण्याबाबत परवानगी घेतली आहे. यामध्ये अध्यापनाचा निश्चित केलेला कालावधी कमी होणार नाही, याची दक्षता संबंधित शाळा व्यवस्थापनाने घ्यावी.”
> - संगीता बांगर, प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण विभाग.

### खासगी शाळांचा नकार

» काही खासगी शाळांनी चौथीपर्यंतचे वर्ग ९ किंवा त्यानंतर भरवणे शक्य होत नसल्याचे पुणे जिल्हा परिषद आणि महापालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाला कळवले आहे. त्या अनुषंगाने त्यांनी दोन सत्रामध्ये शाळा भरवण्यासाठी या कार्यालयाची परवानगी घेतलेली आहे.

### असा आहे शिक्षण विभागाचा आदेश

» सोमवार, 19 जूनपासून शाळेच्या जिल्हा परीषद खाजगी प्राथमिक प्राथमिक शाळांची वेळ सकाळी सात ते दुपारी 12 पर्यंत करण्याचे निर्देश प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील यांनी दिले आहेत तर ज्या माध्यमिक शाळा एक सत्रात भरतात त्यांची वेळ सकाळ सत्रात करण्यास माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी परवानगी दिली आहे. सर्व अनुदानित, अंशतः अनुदानित, स्वयंअर्थ सहाय्यित माध्यमिक शाळांना हा आदेश बंधनकारक आहे.

# भोर-वेल्हे-मुळशीतून कोणत्या दादांची सरशी

## सर्वच राजकीय पक्षांची मोर्चेबांधणी सुरू, उमेदवारी मिळविण्यासाठी गुप्त राजकीय गाठीभेटींना सुरुवात

**पुणे | प्रतिनिधी**

भोर-वेल्हे-मुळशी विधानसभा मतदारसंघांमध्ये आमदारकीसाठी दादांच्या नावाची चर्चा सर्वाधिक असून यापैकी कोणत्या दादांची सरशी होते, हे पाहण्याची उत्सूकता तीनही तालुक्यातील नागरिकांना लागून राहिली आहे. तसे तात्या, बाबा आणि साहेबही चर्चेत आहेत. यामध्ये प्रामुख्याने कॉंग्रेसचे विद्यमान आमदार संग्रामदादा थोपटे यांच्यासह जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व माजी बांधकाम सभापती रणजितदादा शिवतरे (राष्ट्रवादी, अजित पवार गट) , पुणे महानगरपालिकेचे भाजपचे माजी नगरसेवक किरणदादा दगडे आणि चौथे दादा आहेत ते भोर पंचायत समितीचे माजी उपसभापती विक्रमदादा खुटवड(राष्ट्रवादी, अजित पवार गट), असे चार दादा प्रामुख्याने इच्छूक आहेत.

तसेच शिवसेनेचे (शिंदे गट) माजी जिल्हा परिषद सदस्य कुलदीपतात्या कोंडे, भोर पंचायत समितीचे माजी उपसभापती मानसिंगबाबा धुमाळ (राष्ट्रवादी, शरद पवार गट) व मुळशी पंचायत समितीचे माजी उपसभापती व शिवसेना शिंदे गटाचे बाळासाहेब चांदेरे या सर्वांचे विधानसभेसाठी आपापल्या पक्षाची उमेदवारी मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत. तसेच गुप्त राजकीय गाठीभेटींना सुरुवात झाली आहे.

मागील तीन निवडणुकांमध्ये विद्यमान आमदार संग्राम थोपटे यांनी आपले राजकीय कसब दाखवत आपली स्वतःची यंत्रणा व्यक्तिशः राबवत कार्यकर्त्यांच्या जोरावर. कोणत्याही विरोधकांना विशेष महत्त्व न देता आपल्या आमदारकीची विजयी पताका सलग तीन पंचवार्षिक निवडणुकीत फडकवत ठेवली. तर आमदारकीची अनेक वर्षे स्वप्न पाहणारे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष रणजित शिवतरे हे नेहमीच सावध पवित्रा घेत वरिष्ठांची मर्जी सांभाळत जिल्हा परिषदेत पदे मिळविण्यात यशस्वी ठरले. हे जरी खरे असले तरी त्यांची आमदार होण्याची इच्छा अजून तरी अपुरीच आहे.



### शिवसेनेचा पारंपरिक मतदारसंघ असल्याने शिंदे गटही मजबूत...

» विधानसभेसाठी पारंपरिक हा शिवसेनेचा मतदारसंघ असल्याने या मतदारसंघावर शिवसेना प्रभावीपणे दावा करण्याची शक्यता अधिक आहे. शिवसेना फुटीनंतर दोन शकले झाली. या भागातील प्रमुख नेते मोठ्या प्रमाणात शिवसेना शिंदे गटात गेले. कुलदीप कोंडे यांनी तर खासदार सुप्रिया सुळे यांच्या ऐन प्रचारात शिंदे गटात प्रवेश करून परतीचे दोरच कापून टाकले होते. मुळशी तालुक्यात शिवसेना नेहमी बहरली. भोर तालुक्यामध्ये शिवसेनेचा एकदा उपसभापती झाला. तर वेल्हे तालुक्यात शिवसेनेने सभापती पद उपभोगले. या सर्व गोष्टींचा विचार करता ही जागा शिवसेनेला सुटावी म्हणून शिंदे गटाकडून प्रयत्न केले जातील. शिवसेना शिंदे गटाकडून जिल्हा परिषदेचे माजी सदस्य कुलदीप कोंडे व जिल्हाप्रमुख बाळासाहेब चांदेरे हे प्रमुख दावेदार असतील.

### भाजपही प्रबळ दावेदार...

» पुणे महानगरपालिकेचे माजी नगरसेवक भाजपचे किरण दगडे हे झगमगाट असलेल्या भागातून महानगर पालिकेवर निवडून येतात. तिथल्या आणि भोर-वेल्हे तालुक्यातील समस्या वेगळ्या आहेत, याची जाणीव कदाचित त्यांना असेल. त्यांचीही आमदार होण्याची इच्छा मागील दोन वर्षांपासून बळावली आहे. त्यांनी भोर आणि राजगड तालुक्यात लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. नेते की मतदार याचा त्यांना नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत अनुभव आला असेल त्यामुळे त्यांनाही खात्री असली तरी ताक फुंकून प्यावे लागेल. हे मात्र खरे की स्वतंत्र यशस्वी निवडणूक यंत्रणा राबविल्यास त्यांना यशची खात्री वाटते आहे.

> या संपूर्ण विधानसभा मतदार संघात प्रत्यक्ष मतदारांपर्यंत पोहोचणे कठीण आहे. कारण तुम्ही ज्यांच्यावर भरोसा ठेवतात तेच तुम्हाला त्यांच्यापर्यंत पोहोचू देत नाहीत, ही पण एक समस्या आहे. तुम्हाला त्यांचे ऐकावे लागते, कारण तुम्ही आमदार होणार याचे स्वप्न त्यांनी तुम्हाला दाखवले असते. प्रत्यक्ष आपल्याला मतदारांपर्यंत कसे पोहोचता येईल किंवा आपल्याला मतदारसंघातील अचूक माहिती देणाऱ्या रणनीतीकारांची गरज आहे, हे ज्याने शोधले तो यशस्वी होतो.
>
> \- सीताराम रसाळ, ग्रामस्थ गुंजवणे

# भोर तालुक्यात रिक्त पदांमुळे पशुसंवर्धन विभाग सलाईनवर

## जनावरांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर : रिक्त पदे तातडीने भरावीत, पशु पालकांची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

भोर तालुक्यातील राज्य पशुसंवर्धन विभागाच्या मंजूर असलेले सहायक पशुधन विकास अधिकारी पद १ व पशुधन पर्यवेक्षक १२ पदे, अशी १३ पैकी १३ पदे रिक्त आहेत. सध्या पशुधन विकास अधिकारी ही दोनच पदे कार्यरत आहेत. राज्य पशुसंवर्धन विभागाची १५ पैकी तब्बल १३ पदे रिक्त असल्यामुळे जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाकडे अतिरिक्त भार दिला असला तरी तालुक्यातील भौगोलिक परिस्थिती आणि पशुधनाच्या संख्येचा विचार करता ही रिक्त पदांची संख्या मोठी आहे. त्यामुळे भोर तालुक्यातील जनावरांच्या आरोग्याचा प्रश्न एरणीवर आहे.

रिक्तपदांमुळे पशुपालकांची मोठी गैरसोय होत असून मॉन्सूनपूर्व लसीकरणाचा बोजवारा उडाला आहे. पावसाळी काळात आजारी जनावरांवर औषधोपचार कसे करावे. हा मोठा प्रश्न भोर तालुक्यातील पशुधन मालकांना पडला आहे. रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी होत आहे. तालुक्यात राज्य पशुसंवर्धन विभागाचे १५ व जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाचे ११ दवाखाने कार्यरत आहेत.



> शासनाकडून रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. थोड्याच दिवसांत पदे भरली जातील. सध्या रिक्त असलेल्या पदांचा कार्यभार जिल्हा परिषदेच्या पशुधन पर्यवेक्षक यांच्याकडे देण्यात आलेला आहे.
>
> \- डॉ.शुभांगी गांवकरे, अतिरिक्त सहा.आयुक्त.

### पशुंवर उपचार करणे अवघड

» तालुक्यात विसाव्या पशुगणनेनुसार गायी, म्हशी, शेळ्या, मेंढ्या कोंबड्या मिळून ४२ हजार ६१७ एवढे पशुधन आहे. या प्राण्यांवर उपचार करण्यासाठी असलेल्या अपुऱ्या अधिकाऱ्यांना अतिरिक्त कामाच्या ताणामुळे तारेवरची कसरत करावी लागत आहे. पशुविकास अधिकारी, पर्यवेक्षक नसल्याने पशुधनावर वेळेत उपचार होत नाहीत. पाऊस काळात जनावरांमध्ये आजाराचे प्रमाणही जादाच असते. आता गुरांसह अन्य पशूवर वेळेवर उपचार मिळणे अवघड झाले असल्याने जनावरांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

### पशुधनाची बिल्ला मारुन नोंद अनिवार्य

» भोर तालुक्यातील सर्व पशुधन पालकांनी आपल्या सर्व पशुधनास कानातील बिल्ला मारून त्याची नोंद आपल्या कार्यक्षेत्रातील दवाखान्यातील डॉक्टरांकडून भारत पशुधन अँपवर करणे अनिवार्य आहे, असे भोरच्या पशुधन विकास अधिकारी डॉ. वर्षाराणी जाधव यांनी सांगितले.